# पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचे भुयारीकरण पूर्ण

मुंबई - अत्यंत वर्दळीच्या आणि महत्त्वपूर्ण असणाऱ्या पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतच्या १.१३ किमीचे भुयारीकरण अवघ्या ३१८ दिवसात पूर्ण करण्यात आले. कुलाबा- वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ च्या पॅकेज ७ मधील तिसऱ्या भुयारीकरण टप्प्याचे आज अनावरण झाले.

हा सोहळा छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ-टर्मिनल २ या ठिकाणी पार पडला. १५० निष्णात अभियंते, तंत्रज्ञ आणि कुशल कामगार यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे पॅकेज ७ मधील डाऊन मार्गावर ९३७ आरसीसी सिमेंट रिंग्सचा वापर करत तब्बल १.३१ किमी पल्ला गाठण्यात आला.